औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाची मंगळवार दिनांक २६.३.९१ रोजी झालेल्या ६० व्या सभेचा कार्यवृत्तांत.

---

बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. श्री. ईश्वर भोसीकर | सभापती/औरंगाबाद मंडळ |
| २. श्री. अरविंद महाजन | उपसभापती औरंगाबाद मंडळ |
| ३. श्री. बी. एन. माखिजा<br>विभागीय आयुक्त,<br>औरंगाबाद. | सदस्य |
| ४. श्री. गिरीश गोखले<br>विभागीय आयुक्त,<br>नासिक. | सदस्य |
| ५. श्री. मुन्शीलाल गौतम<br>आयुक्त, महानगरपालिका,<br>औरंगाबाद. | सदस्य |

उपसंचालक नगररचना औरंगाबाद व आयुक्त म. न. पा. नासिक हे पुर्वसूचनेनुसार अनुपस्थित होते.

विषय क्र. १: दिनांक २७.२.९१ रोजी झालेल्या ५९ व्या सभेचा कार्यवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. ३५९

दिनांक २७.२.९१ रोजी झालेल्या ५९ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर सविस्तर चर्चा होऊन कार्यवृत्तांत कायम करण्यांत आला.

. . .

मा. सभापती/औरंगाबाद मंडळ यांनी "क" वर्ग नगरपरिषदेच्या ठिकाणी गृहनिर्माण योजना राबविण्यावर भर दिला व अशी सूचना केली की, औरंगाबाद मंडळाकडे ज्या नगरपरिषदेने त्यांच्या हद्दीत गृहनिर्माण योजना राबविण्यासाठी प्रस्ताव पाठविले आहे व त्यांची इच्छा, गृहनिर्माण मंडळामार्फतच गृहनिर्माण योजना कार्यान्वीत करावयाची आहे असे सर्व प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठवून विशेष बाब म्हणून प्राधिकरणाकडून मंजूरी घ्यावी.

ठराव क्र. ३६०

या विषयावर चर्चा होऊन मंडळाने असा अेकमताने निर्णय घेतला की, ज्या "क" वर्ग नगरपरिषदेकडून गृहनिर्माण योजना कार्यान्वीत करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा होत आहे व योजनेच्या अनुषंगाने लागणाऱ्या प्राथमिक बाबी [उदा. जमिन संपादन, व बाह्यसुविधा पुरविण्याची तयारी]

..

पूर्ण केल्या आहेत अथवा उपलब्ध करुन देण्याची हमी घेतली आहे व घराची मागणी २५० पेक्षा जास्त आहे अशा ठिकाणच्या गृहनिर्माण योजना कार्यान्वीत करण्यासाठी प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठवावा व प्राधिकरणाची मंजूरी घ्यावी.

विषय:- लातूर येथील अल्प उत्पन्न गट योजने अंतर्गत १६७ गाळ्यांच्या बांधकामावरील एस्कॅलेशन खर्चाची अदाई करणेबाबत.

ठराव क्र. ३६१

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेतला की, लातूर येथे बांधलेल्या १६७ गाळ्यांचे ठेकेदार मे.एम.आर.कुरेशी यांची एस्कॅलेशनची राहिलेली रक्कम रु. ३५,९२१/- अदा करावी.

विषय क्र.३: औरंगाबाद मंडळाच्या कार्यक्षेत्रातील सहकारी साखर कारखान्या कर्मचा-यासाठी राबवावयाच्या नियोजीत गृहनिर्माण योजनेस हुडको कर्ज मंजूर करुन घेण्यासाठी मंडळाकडून द्यावयाच्या आवश्यक त्या तांत्रिक सहकार्याचा मोबदला म्हणून २% सेवा शुल्क आकारणीबाबत फेरविचार करणे.

ठराव क्र. ३६२

या विषयावर चर्चा करतांना असा निर्णय घेण्यांत आला की, सहकारी साखर कारखान्यांना गृहनिर्माण योजना कार्यान्वीत करण्यासाठी, गृहनिर्माण मंडळाने तांत्रिक सल्ला व मार्गदर्शन उपलब्ध करुन दिल्यास प्रकल्पाच्या खर्चाच्या २% सेवाशुल्क आकारावे असे प्राधिकरणाने ठराव क्र. १८३० दिनांक३०.८.९० अन्वये निर्णय घेतला आहे. या ठरावात ज्या बाबी अंतर्भूत केल्या आहेत त्या जर मंडळाने पूर्ण केल्या तर त्यासाठी सहकारी साखर कारखान्याकडून मंडळाने २% सेवा शुल्क घ्यावे व प्राधिकरणाने ठरवून दिलेल्या बाबीपैकी कांही बाबी स्वत: कारखान्याने पूर्ण केल्यास ज्या बाबी पूर्ण केल्या असतील त्या बाबीसाठी प्राधिकरणाने विहित केलेली टक्केवारी वगळून कमीत कमी १% अथवा सेवेच्या प्रमाणात एक टक्क्यापेक्षा जास्त फी होत असल्यास त्याप्रमाणे फी आकारणी करावी असा प्रस्ताव प्राधिकरणाकडे माहितीस्तव पाठवावा.

विषय क्र.४: कर्मचा-यांना सेवानिवासस्थान म्हणून वाटप केलेले गाळे त्यात राहणा-या कर्मचा-यांना विकत देण्याबाबत.

ठराव क्र.३६३

या विषयावर चर्चेअंती असा निर्णय घेतला की, अशाच प्रकारच्या प्रकरणी व मुंबई मंडळातील कर्मचा-यांना वाटप केलेले सेवानिवासस्थान विकण्याच्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या स्तरावर जो निर्णय घेण्यांत येईल. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यांत यावी. तो पर्यन्त प्रस्ताव प्राधिकरणाकडे स्वतंत्ररित्या पाठवून वेगळे आदेश मागवावेत.

विषय क्र.५: मा.सभापतीच्या परवानगीने आयत्यावेळेस येणार विषय.

१] " निर्मिती केंद्र " औरंगाबाद यांना तात्पुरत्या कालावधीसाठी प्रशिक्षणासाठी जागा देण्याबाबत.

ठराव क्र.३६४

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेतला की, " निर्मिती केंद्रास" प्रशिक्षण वर्ग चालविण्यासाठी अविष्कार कॉलनी एन-६ सिडको नविन औरंगाबाद येथे रिकामे असलेले गोडावून नाममात्र भाडयावर ३ महिन्यासाठी देण्यांत यावे. सदर गोडावून ब-याच दिवसापासून रिकामे असल्यामुळे करावया लागणा-या आवश्यक त्या दुरुस्तीपोटी लागणारी रक्कम रु. सहाशे तीन महिन्याच्या भाडयापोटी घेण्यांत यावी.

२] अमृतधाम नाशिक येथील स.न.२६७/२ वर मंडळाने बांधलेल्या अल्प उत्पन्न गटातील ५४७ गाळयांना बाहयसुविधा अंतर्गत जलनि:सारण वाहिन्या व सेप्टींग टँक बांधकामाचे निविदेबाबत.

यावर उपसभापतींनी सांगितले की, २५% जास्त दराची निविदा ही योग्य निविदा ठरते परंतु ४०.५०% जास्त दराची निविदा प्राप्त झाली आहे. ठेकेदाराचे दर वास्तव नसल्याचे चर्चेमध्ये सांगितले. यावर चर्चेमध्ये असे ठरले की,

एक तर सद्दर ठेकेदारानी दर कमी करावेत अथवा नासिक महानगरपालिकेच्या आयुक्तांची मदत घेऊन लेबर सोसायटीकडून अथवा रेट लिस्टवर काम करून घ्यावे.

ठराव क्र. ३६५-

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, सद्दर ठेकेदार जर ब-याच प्रमाणात दर कमी करून मंडळास परवडणा-या दराने काम करण्यास तयार असल्यास ठेकेदाराकडून काम करून घ्यावे अथवा लेबर सोसायटीकडून किंवा रेट लिस्टवर सद्दरचे काम करून घेण्यांत यावेत.

बैठकीनंतर मा. सभापतीचे आभार मानुन सभा संपली.

. . .